## आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 15.04.2025** **वार- मंगळवार**

---

●भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना १३४व्या जयंतीनिमित्त देशभरातून अभिवादन

·एकसंघ भारताचं श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साकारलेल्या संविधानाला असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

·सिंधुदुर्गमधल्या किल्ल्यांच्या अभ्यासासाठी मुंबई विद्यापिठात स्वतंत्र अध्यासन केंद्र सुरू करणार असल्याची सांस्कृतिक कार्यमंत्र्यांची माहिती

·आणि

·शरण आलेल्या नक्षल्यांसाठी गडचिरोलीमध्ये 'प्रोजेक्ट संजीवनी'ची सुरुवात

**<u>आंबेडकरजयंती</u>**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 134वी जयंती काल देशभरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. संसद भवन परिसरात प्रेरणा स्थळ इथं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती हरीवंश, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातल्या इतर सदस्यांनी बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केलं.

डॉ. आंबेडकर यांच्या प्रेरणेमुळेच आज देश सामाजिक न्यायाचं स्वप्न साकार करण्यासाठी समर्पित वृत्तीनं कार्यरत आहे असं पंतप्रधानांनी समाजमध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

मुंबईत चैत्यभूमीवर राजकीय नेत्यांसह नागरिकांनी डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी काल पहाटेपासून गर्दी केली होती. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विविध मान्यवरांनी चैत्यभूमीला भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केलं.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक क्रांतीचे जनक होते. आधुनिक भारताचा पाया त्यांनी रचला असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी या अभिवादन सोहळ्यात केलं. तर एकसंघ भारताचं श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साकारलेल्या संविधानाला असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र  फडणवीस यांनी सांगितलं. ते म्हणाले ..

**<u>बाईट scripts</u>**

जी समता आणि बंधुता भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेली आहे. आपल्या संविधानाचा जो गाभा आहे हा आपल्याला भगवान गौतम बुद्धांच्या विचारातनंच तयार झालेला पाहायला मिळतो. आणि म्हणूनच हा शाश्वत विचार जो जगाने स्वीकारलेला विचार हा विचार रुजवण्याचं काम हे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलं आज खरं म्हणजे ज्यावेळी त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने आपण सर्व लोक बाबासाहेबांची आयोजन आठवण करतो ज्यावेळी खऱ्या अर्थानं त्यांना नमन करतो त्यावेळी  एकच संकल्प आपण घेतला पाहिजे घेतला  पाहिजे की कुठल्याही परिस्थितीत जी संविधानिक मूल्य आपल्याला सांगितलेली आहे त्या मुल्यापासून आपण दूर होणार नाही भारताच संविधान हे आपल्याकरता सर्वोच्च असेल आणि या संविधानानेच चालण्याचा प्रयत्न आपण करू संविधानाने  चालण्याचा प्रयत्न आपण करू

चैत्यभूमी स्मारकावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांनी चैत्यभूमी इथं वृक्षारोपण केलं. तसंच अखंड भीम ज्योतीला अभिवादन केलं.

नागपूरमध्ये, दीक्षाभूमीवर तसंच संविधान चौकात डॉक्टर बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी अनुयायांनी सकाळपासून रांगा लावल्या होत्या.

डॉ. आंबेडकर यांच्या रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड तालुक्यातल्या आंबडवे या मूळ गावी सामाजिक न्याय आणि विशेष साह्य विभागाच्या वतीनं डॉक्टर आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. पालकमंत्री आणि राज्याचे उद्योगमंत्री डॉक्टर उदय सामंत यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर, सामंत आणि महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या पुतळ्याला आणि अस्थिकलश स्थानी पुष्पहार अर्पण करण्यात आला.

जगभरातून अभ्यासक आणि पर्यटक येतील असं भव्य-दिव्य स्मारक आंबडवे गावी उभारलं जाईल असं आश्वासन सामंत यांनी या वेळी दिलं. तर मंडणगडमध्ये एक हजार एकरमध्ये एमआयडीसी उभारण्यात येईल, त्यामुळे रोजगारनिर्मिती होऊन स्थलांतर थांबण्यास मदत होईल अशी घोषणा कदम यांनी या वेळी केली.

संपूर्ण समाज कायम एकसंध राहायला हवा ही बाबासाहेबांची इच्छा होती, तिची पूर्तता करणं हे आपलं सर्वांचं कर्तव्य आहे असं राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी पुण्यात बोलताना सांगितलं. सिंबायोसिस संस्थेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय आणि स्मारकातर्फे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

पुणे रेल्वे स्थानक परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, विविध संस्था संघटनांच्या प्रतिनिधींनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**विश्व विक्रमी पेन प्रतिकृती**

नाशिकमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त साकारण्यात आलेल्या त्यांच्या आठ फुटी पेनच्या प्रतिकृतीची गोल्डन बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद झाली आहे. सेवादलाचे अध्यक्ष डॉ. वसंत ठाकूर यांच्या

संकल्पनेतून ही प्रतिकृती साकारण्यात आली आहे. डॉ. आंबेडकर यांनी देशाचं संविधान ज्या पेननं लिहिलं, त्या पेनच्या या प्रतिकृतीचं पूजन खासदार डॉ. शोभा बच्छाव आणि मान्यवरांच्या हस्ते झालं.

नाशिक शहरात ठिकठिकाणी बाबासाहेबांच्या जीवन प्रसंगावर देखावे सादर करण्यात आले तर कोल्हापुरात महाआरोग्य शिबीराचं आयोजन करण्यात आलं होतं. धाराशिव जिल्ह्यात तुळजापूरमध्ये बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आलं. राज्यात अन्य जिल्ह्यातही सर्वत्र काल विविध उपक्रमांच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आलं. या निमित्तानं रक्तदान शिबिरं, अन्नधान्य वाटप, भीमगीतांचं सादरीकरण यासारखे सामाजिक सांस्कृतिक उपक्रमही ठीकठिकाणी घेण्यात आले.
या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात..

**<u>अध्यासन</u>**

सिंधुदुर्गमधल्या सिंधुदुर्ग, पद्मदुर्ग, राजकोट, आणि सर्जेकोट या चार किल्ल्यांचा अभ्यास करण्यासाठी मुंबई विद्यापिठात स्वतंत्र अध्यासन केंद्र सुरू करणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी काल जाहीर केली. त्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागातर्फे ५० लाख रुपयांचा निधी देण्यात येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.
सिंधुदुर्ग किल्ल्याला, 12 एप्रिल रोजी ३५८ वर्षे पूर्ण झाली, त्यानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते काल बोलत होते. या चार किल्ल्यांबद्दल अजूनही मोठ्या प्रमाणात माहिती जनतेसमोर येणं आवश्यक असल्याचं शेलार म्हणाले.

**<u>प्रोजेक्टसंजीवनी</u>**

गडचिरोली पोलिसांनी राबविलेल्या विविध लोकोपयोगी उपक्रमांमुळे प्रभावीत होऊन शरण आलेल्या नक्षल्यांसाठी पोलिसांनी 'प्रोजेक्ट संजीवनी' हा नवा उपक्रम सुरु केला आहे. या उपक्रमांतर्गत शरण आलेल्या नक्षल्यांना हक्काचं निवासस्थान मिळावं यासाठी चार रो-हाऊसेस तयार करण्यात येणार आहेत; त्याचं भूमिपूजन पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांच्या हस्ते काल झालं. राज्य शासनाने २००५ पासून नक्षल्यांसाठी आत्मसमर्पण योजना सुरु केली. ही योजना आणि गडचिरोली पोलिसांनी राबविलेले लोकोपयोगी उपक्रम बघून आतापर्यंत ७०४ नक्षल्यांनी पोलिसांपुढे शरणागती पत्करली आहे. यातील बहुतांश जणांचं पुनर्वसन पोलिसांनी केलं आहे. त्यांच्यासाठी आता 'प्रोजेक्ट संजीवनी' हा नवा उपक्रम सुरु करण्यात आला.

**राज्यपालप्रार्थना**

वाढती लोकसंख्या, महानगरांची होणारी वाढ, औदयोगिक क्षेत्रं यामुळे अग्निशमन सेवेचं  कार्य आव्हानात्मक झालं असल्याचं राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय अग्निशमन दिनानिमित्त राज्यस्तरीय अग्निशमन सेवा सप्ताहाचा प्रारंभ काल  राज्यपालांच्या उपस्थितीत मुंबईत झाला; त्यावेळी ते बोलत होते. मुंबई अग्निशमन दल तसंच तसेच राज्याच्या इतर महानगर पालिकांमधल्या ८ अग्निशमन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना यावेळी राज्यपालांच्या हस्ते गुणवत्तापूर्ण अग्निशमन सेवेसाठी  राष्ट्रपती पदक प्रदान करण्यात आले. अग्निशमन विषयाच्या सर्वंकष अध्ययनासाठी एक संशोधन संस्था निर्माण करण्याचं आवाहन राज्यपालांनी यावेळी केलं.

**चोक्सीअटक**

पंजाब नॅशनल बँकेच्या कर्ज गैरव्यवहार  प्रकरणी फरार हिरे व्यापारी, मेहुल चोक्सी याला पोलिसांनी बेल्जियम पोलिसांनी अटक केली आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाच्या विनंतीवरून चोक्सीला शनिवारी अटक करण्यात आली असून तो सध्या तुरुंगात आहे. पंजाब नॅशनल बँकेतल्या साडे तेरा  हजार पाचशे

कोटी रुपयांच्या कर्ज फसवणूक प्रकरणी त्याच्याविरोधात मुंबईतल्या न्यायालयानं अटक वॉरंट जारी केलं होतं. याप्रकरणातला दुसरा आरोपी नीरव मोदीचं लंडनमधून प्रत्यार्पण व्हायचं आहे. गैरव्यवहार उघड होण्याच्या काही दिवस आधी, जानेवारी २०१८ मध्ये तो देशाबाहेर पळून गेला होता.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल लखनौच्या एकाना क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्ज संघानं लखनऊ सुपर जायंट्सवर पाच गडी राखून विजय मिळवला आणि आपली पाच सामन्यांतील पराभवाची मालिका खंडित केली. प्रथम फलंदाजी करताना, लखनऊ संघानं निर्धारित २० षटकांत सात गडी गमावून १६६ धावा केल्या. त्याचा पाठलाग करताना कर्णधार महेंद्रसिंग धोनी आणि शिवम दुबेच्या धमाकेदार खेळीमुळे चेन्नईनं १९ षटक आणि तीन चेंडूत १६७ धावांचं लक्ष्य गाठलं आणि सामना जिंकला. महेंद्रसिंग धोनीला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं.

**<u>हवामान</u>**

कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी तापमानात सरारीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे. पुढील दोन ते तीन दिवस विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात काही ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

नमस्कार